**नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.**

**दिनांक ११/०४/२०२५ (शुक्रवार)**

---

## भारतीय स्टेट बॅंकेचे ए.टी.एम. फोडण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला सावनेर पोलीसांनी केली तात्काळ अटक

## ८ घरफोडीचे गुन्हे उघड,एकुण १ लाख,४५ हजार,२०० रूपयांचा मुद्देमाल जप्त

**पोलीस स्टेशन सावनेर** :— दिनांक ०७/०४/२०२५ रोजी पहाटे ०४:०० वाजता सावनेर पोलीस पेट्रोलींग करीत असतांना ते भारतीय स्टेट बॅक शाखा डब्ल्युसिएल वाघोडा येथील ए.टी.एम. चेक करण्यास गेले असता एक इसम सदर ए.टी.एम फोडतांना दिसुन आला.पोलीसांनी त्याला पकडण्याचा प्रयत्न केला असता, अंधाराचा फायदा घेवुन तो आरोपी पळुन गेला. त्यावेळी विभागिय गस्त अधिकारी श्रीमती मंगला मोकाशे , सहा पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन सावनेर यांनी तात्काळ माहीती देवुन पोलीस स्टेशन चे सर्व स्टाफ बोलावुन घेतला. तात्काळ पोलीसांनी शहरात नाकाबंदी व पेट्रोलींग सुरू केली. पेट्रोलींग दरम्यान पोलीसांना आरोपी नामे संकेत ईश्वर गेडाम हा दादाजी नगर, सावनेर येथे मिळुन आला.पोलीसांनी पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली असता त्याच्या खिशात दागिने व ए.टी.एम. फोडण्याकरीता वापरलेला लोखंडी रॉड मिळुन आला. पोलीसांनी त्याच्या ताब्यात मिळुन आलेल्या मुद्देमालाबाबत विचारपुस केली असता आरोपीने सावनेर शहरात घरफोडी केल्याचे सांगितले.तसेच तांत्रिक पुराव्या वरून ए.टी.एम. फोडणारा आणि घरफोडी करणारा **आरोपी संकेत इश्वर गेडाम,वय—२७ वर्षे ,रा. वार्ड क्र.०४ सावने**र हाच असल्याचे निष्पन्न झाले.

पोलीसांनी नमुद आरोपीला सखोल विचारपुस करून दिनांक ०७/०४/२०२५ रोजी २१.०१ वाजता अटक करून आरोपीला मा. न्यायालयात समक्ष हजर करून आरोपीचा दिनांक ११/०४/२०२५ रोजी पावेतो पोलीस कस्टडी रिमांड प्राप्त केला. दरम्यान कालावधीत आरोपी पोलीस कस्टडी रिमांड मध्ये असतांना पोलीसांनी आरोपीची सखोल विचारपुस केली असता

मागील एक वर्षा पासुन त्याने सावनेर शहर व डब्ल्युसीएल वाघोडा परीसरात एकुण ०८ घरफोडी केल्याची माहीती पोलीसांच्या हाती लागली. **आरोपीच्या ताब्यातुन पोलीसांनी सोन्या चांदीचे दागिने आणि ए.टी.एम फोडण्यासाठी वापरलेला लोखंडी रॉड असा एकुण किंमती १,४५,२००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, उपविभागिय पोलीस अधिकारी रामटेक,यांची कारवाई

**पोलीस स्टेशन रामटेक** :— दिनांक १०/०४/२०२५ रोजी श्री रमेश बरकते ,उपविभागिय पोलीस अधिकारी ,रामटेक हे त्यांच्या पथकासह अवैधरित्या धंदयावर कारवाई करणेकामी पेट्रोलींग असतांना त्यांना गुप्त बातमीदाराकडुन माहीती प्राप्त झाली की, तुमसर ते रामटेक रोडने अवैधरित्या विनापरवाना रेतीची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी बसस्टॉप रामटेक,जवळ नाकाबंदी केली असता त्यांना टाटा कंपनीचा ट्रक क्र एम एच ३६ ए.ए. ४३२३ हे वाहन येताना दिसले. पोलीसांनी वाहन चालकास वाहन थांबविण्याचा इशारा केला परंतु त्याने वाहन न थांबविता तेथुन वाहनसह पळ काढला. पोलसांनी शिताफिने सदर वाहनाचा पाठलाग करून हॉटेल शिवार, रामटेक समोर रोडच्या कडेला वाहन थांबविले. वाहन **चालक आरोपी नामे नितीन सोमा पारधि, वय २६ वर्ष, रा.डोंगरला ता. तुमसर जि भंडारा,याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्या कडे वैध परवाना नव्हता. वाहन मालकाबाबत विचारपुस केली असता वाहन मालक नामे नितेश बागवान पारधि, रा. डोंगरला ता. तुमसर, जि भंडारा याच्या सांगणेवरून चालक आरोपीने तुमसर येथील लोभी डेपो मधुन रेती भरून असल्याची माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष अवैध रेती आणि टाटा कंपनीचा ट्रक क्र एम एच** ३६ ए.ए. ४३२३ **असा एकुण ४५,३५,००० /— रुपयांचा माल मुददेमाल जप्त केला आहे.**

**नमुद आरोपी चालक आणि मालक यांच्याविरूध्द पोस्टे रामटेक येथे कलम ३०३(२),३(५) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सह कलम ४,२१ खाण खनिज अधिनियम, अन्वये गुन्हा दाखल करण्यात आले आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने